प्रेसनोट दि.३१/०८/२०१७

## सामाजिक सुरक्षा विभागाकडुन बुधवार पेठेत छापा टाकुन वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश करुन २ अल्पवयीन पिडीत मुलींची सुटका

दि.३०.०८.२०१७ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, यांना रेस्क्यु फाऊन्डेशन, पुणे, या स्वयंसेवी संस्थे तर्फे माहीती मिळाली की, सपना बिल्डीग, बुधवार पेठ पुणे येथील चौथ्या मजल्याचे खोलीत राज्यातील व परराज्यातील सज्ञान व अल्पवयीन मुलींकडुन वेश्याव्यवसाय करुन घेतला जातो. त्यात दोन अल्पवयीन मुलींचा समावेश असुन त्यांचेकडुन जबरदस्तीने हे काम करवुन घेतले जात आहे, बाबत माहीती मिळाले वरुन सामाजिक सुरक्षा विभागाच्या वतीने तात्काळ पडताळणी द्वारे छापा कारवाई करण्यात आली. यादरम्यान सदर दोन अल्पवयीन पिडीत मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन काळजी व संरक्षण तसेच पुर्नवसनकामी रेस्क्यु फाऊन्डेशन पुणे यांच्या ताब्यात दिले आहे. नमुद दोन अल्पवयीन पिडीत मुलींपैकी एक नेपाळ देशातील असुन दुसरी पश्चिम बंगाल येथील आहे. सदर प्रकरणी कुंटणखाना मालकीण मंजु उर्फ डिंपल सैला तमांग उर्फ रमिला मिलन तमांग, वय ३५ वर्षे रा. नुवाकोट, बालकुमारी वार्ड नं. ६, बागमती आंचल, नेपाल सध्या राहणार – चौथा मजला, सपना बिल्डींग, बुधवार पेठ पुणे हिचेसह इतर साथीदार असे एकुण ६ आरोपी यांचे विरुध्द फरासखाना पोलीस स्टेशन येथे गुरनं. १९४/२०१७ भा.दं.वि.क. ३७६,३६६(अ),३७०, ३७०(अ),३४ सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासुन संरक्षण अधिनियम सन २०१२ चे क. ४,६,१७ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम. १९५६ कलम ३,४,५,६,७ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास फरासखाना पोलीस स्टेशनकडे सुपुर्त केला आहे.

**वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, सपोनि शीतल भालेकर, सपोनि चंद्रकांत जाधव, रमेश लोहकरे, नितिन तरटे, संजय गिरमे, नामदेव शेलार, ननिता येळे, कविता नलावडे, नितिन तेलंगे, प्रदिप शेलार, गीतांजली जाधव, सचिन कदम, नवनाथ पिंगळे, राजेद्र कचरे, संदीप गायकवाड,यांनी केलेली आहे.**